# राष्ट्रीय आरोग्य अभियान
# आशा स्वंयसेविका योजना
## आरोग्य विभाग, जिल्हा परिषद-पालघर

राष्ट्रीय आरोग्य अभियान, आशा स्वंयसेविका योजना, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद पालघर कडून खालील पदाकरिता कामावर आधारित मोबदला पध्दतीने नेमणूक करावयाची आहे. तरी, इच्छूक उमेदवारांकडून खालील पदांसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता | ठिकाण | राखीव | वयोमर्यादा | रिक्त पदांची संख्या | एकत्रित मानधन (रु) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | गटप्रवर्तक | किमान पदवीधर, (उच्चतम शैक्षणिक पात्रता धारकास प्राधान्य MS-CIT, मराठी टायपिंग (३० शब्द प्रतिमिनिट) व इंग्रजी टायपिंग (४० शब्द प्रतिमिनिट),Word or Excel अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य. | वसई-विरार मनपास्तर | महिला उमेदवार | २१ ते ३८ | १ | ८६००/- |

१. सदरची पदे निव्वळ कामावर आधारित मोबदला करार तत्वावरील असून ११ महिन्यांच्या कालावधीकरिता आहेत.
२. उच्च शैक्षणिक पात्रता व अनुभव असणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.
३. पदसंख्येमध्ये बदल होण्याची शक्यता आहे. संख्येमध्ये बदल होईल किंवा सेवा संपुष्टात आणण्यात येतील.
४. उमेदवारांनी अर्जामध्ये भरावयाची माहिती पुढीलप्रमाणे-
१)अर्ज केलेल्या पदाचे नाव, २)ठळक अक्षरात स्वतःचे संपूर्ण नाव, ३)अर्जदाराचा पत्ता, दूरध्वनी क्रमांक/भ्रमणध्वनी क्रमांक(अनिवार्य), ई-मेल, ४)कामाचा अनुभव-काम केलेली संस्था-एकूण कालावधी, ५)शैक्षणिक अर्हतेचा संपूर्ण तपशील-अभ्यासक्रमाचे नाव, संस्था, विद्यापीठाचे नाव, उत्तीर्ण झाल्याचे वर्ष, गुणांची टक्केवारी, ६)इतर शैक्षणिक अर्हता.
५. मुलाखतीसाठी कोणताही प्रवास खर्च अथवा भत्ता देण्यात येणार नाही.
६. सदयस्थितीमध्ये आशा स्वंयसेविका व गटप्रवर्तक म्हणुन कार्यरत असलेल्या महिलांना प्राधान्य.
७. पदे भरती व अंतिम निवड यादी करण्याचे अधिकार जिल्हा निवड समितीला राहतील.

वरील पदांकरिता उमेदवारांनी त्यांचे नाव, वय, पत्ता, संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक, शैक्षणिक अर्हता यांचे प्रमाणित झेरॉक्स प्रतींसह अर्ज मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांच्या नावे दिनांक **२७/११ /२०२० ते दिनांक ०४/१२ /२०२०** पर्यंत (सुटटी चे दिवस वगळून) कार्यालयीन वेळेत जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, जुने गट विकास अधिकारी निवासस्थान, कचेरी रोड, पालघर येथे अर्ज सादर करावते. दिनांक **४/१२/२०२० नंतर** आलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. टपालाव्दारे आलेले अर्ज विहित मुदतीत प्राप्त न झाल्यास स्वीकारले जाणार नाहीत.

**अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख**

**वेळ - सकाळी १०.०० ते संध्या. ६:१५ वाजे पर्यंत (दिनांक २७/११ /२०२० ते ०४/१२/२०२०)**

**आरोग्य विभाग, जिल्हा परिषद पालघर**

सही / -

(डॉ.दयानंद सुर्यवंशी)
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद पालघर तथा सदस्य सचिव
जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी

सही / -

( सिध्दाराम सालीमठ भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद पालघर तथा अध्यक्ष
जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी

Scanned with CamScanner